POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

बातमीपत्र

● वर्ष -०५ ● अंक-३६ ● मुंबई, सोमवार,०८ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## पत्रकारांना धमकावल्याबद्दल रु. 50 हजार दंड, 24 तासांत तुरुंगवास - मोदी



■मुंबई । प्रतिनिधी,

भारतातील पत्रकारिता संकटाच्या काळातून जात आहे. सत्याचा आवाज बुलंद करणाऱ्या पत्रकारांवर हल्ले दिवसेंदिवस वाढत आहेत. पत्रकारांच्या सुरक्षेच्या बाबतीत भारताला अत्यंत धोकादायक देशांच्या यादीत स्थान देण्यात आले आहे. दरवर्षी देशातील शेकडो पत्रकारांना वार्तांकन करताना जीव गमवावा लागतो. बातम्या कव्हर करताना पत्रकारांना धमकावणे नित्याचे झाले आहे. पण आता पत्रकारांना अशा धमक्या देणाऱ्यांची अवस्था चांगली राहिलेली नाही. आता पत्रकारांशी कोणी गैरवर्तन केले तर त्याला तुरुंगात जावे लागू शकते.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या टिप्पणीनंतर, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले की जो कोणी पत्रकारांशी असभ्य वर्तन करेल किंवा त्यांना धमकावण्याचा प्रयत्न करेल त्याला 50 रुपये दंड आकारला जाईल. हजार रुपयांपर्यंत दंड लागू करता येईल. याशिवाय त्यांना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासही होऊ शकतो, धमकीच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या लोकांना सहजासहजी जामीन मिळणार नाही, असे योगी म्हणाले. त्यामुळे पत्रकारांशी कोणत्याही प्रकारचा असभ्य वर्तन करू नका आणि पत्रकारांना सन्मान द्या. अलीकडे महाराष्ट्रात, प्रसारमाध्यमांवर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार किंवा मीडिया व्यक्ती आणि माध्यम संस्थांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. पत्रकारांवरील हल्ल्याच्या घटना उघडकीस येत आहेत. सीएम योगी आदित्यनाथ म्हणतात की जर कोणत्याही पत्रकाराला कोणत्याही प्रकारची समस्या आली तसे असल्यास, त्यांच्याशी त्वरित संपर्क साधा. गुंडगिरी करणाऱ्या व्यक्तीला २४ तासांच्या आत तुरुंगात पाठवले जाईल. सीएम योगी कडक स्वरात म्हणाले, पत्रकारांशी आदराने बोला अन्यथा तुम्हाला महागात पडू शकते.

## आकाशातून अखंड जलाभिषेक अन भक्तांकडून पुष्पवृष्टी; भक्तीसागरात बाप्पांचे विसर्जन

■मुंबई । प्रतिनिधी,

विघ्नहर्ता, सुखकर्ता, दुःखहर्ता, विनायक अशा नावारूपांनी कोट्यवधी गणेशभक्तांच्या मनात घर करून बसलेल्या गणेशाचे गेल्या 27 ऑगस्ट रोजी गणेश चतुथीर्ला आगमन झाले. आपल्या कोट्यवधी भक्तांच्या मनात, घराघरात, गणेशमंडळात गेल्या 10 दिवसांपासून विराजमान गणरायांना शनिवारी (6 सप्टेंबर) अनंत चतुर्दशीला कोट्यवधी गणेशभक्तांनी समुद्रात, नैसर्गिक तलावात अशा 70 ठिकाणी आणि पालिकेने उभारलेल्या 298 कृत्रिम तलावात भावपूर्ण निरोप दिला. तसेच, ह्यगणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या ह्य, अशी आर्त हाक देत कोट्यवधी गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला. त्यावेळी भक्तांच्या एका डोळ्यांत आनंदाश्रू होते तर दुसऱ्या डोळ्यात भावाश्रू होते. शनिवारी सकाळपासूनच आकाशामधून संततधारेच्या स्वरूपात जलाभिषेक सुरू होता. मात्र दुसरीकडे कोट्यवधी गणेशभक्तांचा जनसागर आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी मुंबईतील गिरगाव, दादर, माहीम, वसोर्वा, मढ-मार्वे इत्यादी समुद्र चौपाट्यांच्या ठिकाणी, पवई, कुर्ला तलाव आणि कृत्रिम तलावांच्या ठिकाणी लोटला होता. गणरायांना निरोप देताना आकाशातून कधी संयत, अधूनमधून जोरदार कोसळणाऱ्या पावसाची तमा न बाळगता कोट्यवधी गणेशभक्तांनी काही ठिकाणी फटाके फोडत, गुलाल आणि फुलांची उधळण करत, नाशिक ढोल-ताशा, बेंजो यांच्या तालावर नाचत जल्लोष केला. यावेळी, समुद्री चौपाटी आणि नैसर्गिक तलाव परिसर, कृत्रिम तलाव परिसर, मुख्य रस्ते आणि गल्लीबोळात कोट्यवधी गणेश भक्तांनी ही गर्दी केली होती.



रात्री 9.00 वाजेपर्यंत मुंबईतील समुद्रात, खाडीत आणि नैसर्गिक तलावात आणि महापालिकेने यंदा उभारलेल्या 298 कृत्रिम तलावांच्या ठिकाणी एकूण 17,944 गणेशमूर्तींचे विसर्जन आणि 242 गौरींचे विसर्जन करण्यात आले. या 17,944 विसर्जित मूर्तींमध्ये सार्वजनिक 1,058 गणेशमूर्तींचा आणि 16,886 घरगुती गणेशमूर्तींचा समावेश आहे. दरम्यान, श्रीगणेशाला निरोप देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेचे सभापती रामनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, राज्य मंत्री योगेश कदम, भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम आदींनी गिरगाव चौपाटी येथे महापालिकेच्या शामियानात उपस्थिती दर्शवली होती. मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांचे स्वागत मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी केले.

## पुण्यातील गणेश मंडळाचा उच्छाद, पोलिसांच्या नाकावर टिच्चून डीजे अन फटाके फोडले, 26 तास उलटूनही विसर्जन मिरवणुका सुरुच

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यातील विसर्जन मिरवणूकीला 26 तास उलटूनही मात्र अजुनही मोठ्या प्रमाणात गणपती मंडळांच्या विसर्जन मिरवणूका सुरु आहेत. काल साडेनऊ वाजता पुण्यातील विसर्जन मिरवणूकीला सुरुवात झाली होती. पाच मानाच्या गणपतींचे आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन वेळेत झाले. मात्र त्यानंतर पुण्याची विसर्जन मिरवणूक रेंगाळली.





पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक अजून ही सुरूच आहे, मिरवणुकीला काल सकाळी साडेनऊ वाजता सुरुवात झाल्यानंतर आत्ताही मिरवणुका सुरूच आहेत. नियोजन करूनही पुण्यातील विसर्जन मिरवणूक रेंगाळली आहे, पोलिस मिरवणुका आवरण्याचे आवाहन करत आहेत. पुण्यात सकाळी 11.30 वाजेपर्यंत 163 गणेश मंडळ अलका टॉकीज चौकातून विसर्जन घाटाकडे मार्गस्थ झाले आहेत. अजून किमान 60-70 मंडळ मार्गस्थ व्हायचे आहेत. मिरवणूक संपायला 2-3 वाजण्याची शक्यता आहे.

पुण्यात नियमांचे उल्लंघन; गणेश मंडळावर कारवाई

गणेश विसर्जन मिरवणुकीत फटाक्यांवर स्पष्ट बंदी असतानाही राष्ट्रभूषण गणपती मंडळाने अलका टॉकिज चौकात थांबून जोरदार आतषबाजी केली. या प्रकारामुळे परिसरात प्रचंड गर्दी झाली होती. सुदैवाने कोणतीही जखमी किंवा मोठे नुकसान झालेले नाही. मात्र, नियमांचे उल्लंघन करून मंडळाकडून फटाके फोडण्यात आले.

विसर्जन मिरवणुकीदरम्यान फटाक्यांवर पोलीस आणि प्रशासनाकडून पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. तरीही मंडळाने थेट बंदी झुगारून उच्छाद मांडल्याची चर्चा सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत कारवाई केली असून एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं आहे. पुढील चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अलका टॉकीज चौकात चौफेर पोलीस पण मंडळांचा अच्छाद संपत नसल्याचे चित्र आहे. दगडी नागोबा गणेश मंडळाकडून भर चौकात फटाक्यांची अतिशबाजी करण्यात आली आहे.

### मानाच्या गणपतींचे विसर्जन कधी झाले?

मानाचा पहिला कसबा गणपती
-3:47 वाजता म्हणजे 6 तास 17 मिनिटांनी विसर्जन झालं.
मानाचा दुसरा तांबडी जोगेश्वरी गणपती
-4:10 वाजता म्हणजे 6 तास 40 मिनिटांनी विसर्जन झालं.
मानाचा तिसरा गुरुजी तालीम-
4:35 वाजता म्हणजे 7 तास 05 मिनिटांनी विसर्जन झालं.
मानाचा चौथा तुळशीबाग गणपती
-4:59 वाजता म्हणजे 7 तास 29 मिनिटांनी विसर्जन झालं.
मानाचा पाचवा केसरीवाडा गणपती
-5:39 वाजता म्हणजे 8 तास 09 मिनिटांनी विसर्जन झालं.
-तर दगडू शेठ हलवाई गणपती मिरवणूक सायंकाळी 4 वाजता सुरु झाली..विसर्जन 9 वाजून 23 मिनिटांनी म्हणजेच 5 तास 23 मिनिटांनी झाले.भाऊ रंगारी गणपती 3 वाजून 21 मिनिटांनी अलका चौकात पोहचला त्यानंतर त्याचे विसर्जन झाले.

## मुंबईत साखळी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी, एकाला केले अटक

■मुंबई । प्रतिनिधी,

सर्वत्र अनंत चतुर्दशी ची धामधूम असताना, मुंबई वाहतूक पोलिसांच्या हेल्पलाइन क्रमांकावर मुंबईत साखळी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकीपर संदेश देण्यात आला आहे. अनंत चतुदर्शीच्या पूर्वसंध्येला मुंबई पोलिसांच्या व्हॉट्सॲप नंबरवर हा धमकीचा संदेश मिळाला असल्यामुळे पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. ज्यामध्ये मुंबईत 34 वाहनांमध्ये मानवी बॉम्ब पेरण्यात आल्याचा दावा करण्यात आला.



यासंदर्भात पोलिसांनी धडक कारवाईला सुरुवात करत एकाच्या मुसक्या देखील आवळल्या आहेत. संशयित आरोपीला नोएडा पोलिसांनी अटक केली असून, हा आरोपी मूळ बिहारचा आहे, आणि पाच वर्षांपासून तो नोएडामध्ये राहतो.

अश्विनी असे नाव असलेल्या आरोपीला नोएडा सेक्टर-११३ मध्ये पकडण्यात आले आणि मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून एक मोबाईल फोनही जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धमकी देणाऱ्याने स्वतःला पाकिस्तानमधील जिहादी संघटनेचा सदस्य असल्याचे सांगितले होते. अनेक पाकिस्तानी दहशतवादी शहरात घुसल्याचा दावा केला होता. सुरुवातीला त्याने स्वतःला ज्योतिषी असल्याचे म्हणवले आहे.


परंतु पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपीने शहरात अनेक ठिकाणी 34 गाड्यांमध्ये बॉम्ब ठेवल्याचा दावा केला होता. तब्बल चारशे किलो आरडीएक्स वापरून मोठा हल्ला करण्याची धमकी दिली होती, ज्यामुळे एक कोटी लोकांचा जीव जाईल, असेही म्हटले होते.

### धमकीत काय म्हंटले आहे?

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर, वाहतुकीबाबत तक्रारीसाठी वाहतूक पोलिसांच्या वतीने व्हाट्सअप क्रमांक देण्यात आला होता. या क्रमांकावर शुक्रवारी एका अनोळखी क्रमांकावरून संदेश आला. ज्यात १४ पाकिस्तानी भारतात घुसले असून, मुंबईत बॉम्बस्फोट मालिका घडविण्यात येणार आहे. यासाठी ४०० किलो ह्यआरडीएक्सह्णचा वापर करण्यात आला असून, सुमारे एक कोटी लोकांचा मृत्यू होऊ शकतो, असा दावा या संदेशात करण्यात आला आहे. मुंबईत गणेशोत्सव अंतिम टप्प्यात असताना ऐन अनंत चतुर्दशीच्या तोंडावर धमकी देण्यात आल्याने पोलिस यंत्रणा गंभीर झाली आहे. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये म्हणून, मुंबई पोलिसांकडून महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली असून, प्रत्येक वाहनांची कसून तपासणी सुरु आहे. पोलिसांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले असून कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती दिसल्यास पोलिसांना माहिती देण्यास सांगितलेले आहे.

## भटक्या कुत्र्यांची दहशत

### महिलेवर जीवघेणा हल्ला, ज्येष्ठ नागरिकाला आणि चार मुलांना केले जखमी



■बंगळुरू । प्रतिनिधी,

कर्नाटकमधील होन्नाली तालुक्यात भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे. तुमकुरु जिल्ह्यात गुब्बी न्यायालयाजवळ भटक्या कुत्र्यांनी महिलेवर जीवघेणा हल्ला केला. होन्नाली तालुक्यात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चार मुले आणि एक वृद्ध जखमी झाले. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने कठोर पावले उचलावी, अशी मागणी केली आहे. तर नागरिकांनी भूतदयेपोटी कुत्र्यांना खाण्यापिण्यास घालणे थांबवले आणि परिसर स्वच्छ ठेवावा; असे आवाहन प्रशासनाने केले आहे. अनेक कुत्रे रस्त्यावर पडलेल्या कचऱ्यात अन्न पाणी शोधतात. काही नागरिक वेगवेगळ्या कारणांमुळे सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना खाऊपिऊ घालतात. यामुळे रस्त्यांवरचा मोकाट कुत्र्यांचा वावर वाढत जातो. या भटक्या कुत्र्यांमुळेच नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे, असे स्थानिक प्रशासनाचे म्हणणे आहे. गुब्बी न्यायालयाजवळ भटक्या कुत्र्याने महिलेवर जीवघेणा हल्ला केला. पीडित महिलेचे नाव गंगुबाई (३५) असे आहे. ती तिप्तूर तालुक्यातील बीरसंद्रा गावातील रहिवासी होती. ती एका कौटुंबिक वादाच्या खटल्यात न्यायालयात आली होती. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, गंगुबाई न्यायालयाच्या आवारातील स्वच्छतागृहातून बाहेर आल्या आणि भटक्या कुत्र्यांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला.

भटक्या कुत्र्यांनी हल्ला करताच दचकलेल्या गंगुबाई यांनी आरडाओरडा केला. आवाज ऐकून स्थानिक मदतीसाठी आले. स्थानिकांनीच गंगूबाई यांना भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यापासून संरक्षण दिले. यानंतर संतापलेल्या ग्रामस्थांनी भटक्या कुत्र्याचा पाठलाग केला आणि त्याला ठार मारले. जखमी महिलेला प्रथम प्राथमिक उपचारासाठी गुब्बी तालुका रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर बंगळुरू येथील मोठ्या रुग्णालयात पाठवण्यात आले. कर्नाटकमधील दावणगेरे जिल्ह्यातील . होन्नाली तालुक्यात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चार मुले आणि एक वृद्ध जखमी झाले. जखमींवर शिवमोगा मॅकगॅन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर स्थानिकांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची प्रशासनाकडे मागणी केली आहे.

## तब्बल १२ हजार कोटींची ड्रग्ज फॅक्टरी उद्धवस्त! मीरा-भाईंदर पोलिसांची कमाल!

■मीरा-भाईंदर । प्रतिनिधी,

मीरा रोडमधील एमडी ड्रग्ज प्रकरणाचा तपास करत असताना मीरा-भाईंदर पोलिसांना एक मोठे यश मिळाले आहे. पोलिसांनी थेट हैदराबादमध्ये छापेमारी करून तब्बल १२ हजार कोटी रुपयांची ड्रग्ज फॅक्टरी उद्धवस्त केली आहे. तेलंगणातील चेरापल्ली येथे ही गुप्त फॅक्टरी चालवली जात होती. या कारवाईत पोलिसांनी ३२ हजार लिटर कच्चे ड्रग्ज (रॉ मटेरियल) जप्त केले असून, आतापर्यंत १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईची सुरुवात केवळ २०० ग्रॅम ड्रग्ज पकडण्यापासून झाली होती. पोलिसांनी या छोट्या सुगाव्यावरून तपास पुढे नेला आणि त्यांना थेट हैदराबादमधील या मोठ्या रॅकेटची माहिती मिळाली. त्यानंतर मीरा-भाईंदर वसई-विरार



आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिटने १४ पोलिसांच्या टीमसह हैदराबादमध्ये छापा टाकला आणि २५ लाखांच्या ड्रग्जपासून सुरू झालेल्या तपासाचा शेवट १२ हजार कोटींच्या अमली पदार्थांच्या मोठ्या जाळ्याला उद्धवस्त करून झाला. मीरा-भाईंदरचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी या कारवाईची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ₹गुन्हे शाखेच्या युनिटने एका महिन्याच्या अथक प्रयत्नानंतर हे मोठे यश मिळवले आहे.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये फॅक्टरीचा मालक, एक केमिकल ॲनालायझर आणि एक विदेशी नागरिक यांचा समावेश आहे. या प्रकरणात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता असून, संपूर्ण रॅकेट उध्वस्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कारवाईचे कौतुक केल्याचे त्यांनी सांगितले.

## शॉर्ट सर्किटमुळं मुंबईत इमारतीला भीषण आग ! गुदमरून 80 वर्षीय महिलेचा मृत्यू, 5-6 गंभीर

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

दहिसर पूर्व परिसरातील शांतीनगर भागात असलेल्या न्यू जन कल्याण इमारतीत रविवारी दुपारी मोठी आग लागल्याची घटना घडली. दुपारी साधारणपणे ३ वाजण्याच्या सुमारास सातव्या मजल्यावर अचानक ही आग लागली. गुदमरल्यामुळे 5-6 जण गंभीर जखमी झाले असून, एका 80 वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दहिसरमधील शांती नगर येथील न्यू जनकल्याण सोसायटीमधील 23 मजली निवासी इमारतीच्या सातव्या मजल्यावर रविवारी दुपारी आग लागली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुपारी 3.05 च्या सुमारास आगीची माहिती मिळाली, त्यानंतर मुंबई अग्निशमन दलाने (एमएफबी) सात अग्निशमन गाड्या सहाय्यक वाहनांसह घटनास्थळी पाठवल्या, असे एका महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले. प्राथमिक माहितीनुसार, इमारतीच्या मीटर बॉक्समध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीत मोठ्या प्रमाणात धूर संपूर्ण इमारतीत पसरला. धुरामुळे इमारतीत अडकून राहिलेल्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवळपास 7 ते 8 बंब घटनास्थळी दाखल झाले. तब्बल एका तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र, इमारतीत पसरलेल्या दाट धुरामुळे बचाव कार्यात अडचणी येत होत्या. तरीही अग्निशमन दलाने वेळीच कारवाई करून रहिवाशांना बाहेर काढले.



श्वसनास त्रास होऊन काही रहिवासी अडकून पडले रविवार असल्याने इमारतीत बहुतांश लोक घरी होते. अचानक लागलेल्या आगीमुळे नागरिकांमध्ये गोंधळ उडाला. धूर पसरल्याने श्वसनास त्रास होऊन काही रहिवासी अडकून पडले. त्यांना तत्काळ बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या माहितीनुसार, काहींची प्रकृती चिंताजनक आहे. सध्या पोलिसांनी एडीआर नोंदवला असून आगीचे नेमके कारण आणि जबाबदार कोण याचा तपास सुरू आहे. या दुर्घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण असून, नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# स्वस्ताई येणार?




सणांत आनंद असतोच. पण, सणाआधीच सणाचा आनंद देण्याची किमया केंद्र सरकारच्या जीएसटी संदभार्तील सुधारणांनी केली आहे. बाजारात त्यामुळे सध्या ह्यफील गुडह्ण वातावरण आहे. ह्यफील गुडह्ण म्हणण्याचं कारण एवढंच, की या सुधारणा २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. सुधारणा प्रत्यक्षात अमलात यायला आणखी १५ दिवसांचा अवधी असला, तरी त्याची सविस्तर घोषणा आधीच झाली असल्यामुळे उत्पादक, विक्रेते आणि ग्राहकांनाही या सुधारणा गृहीत धरून तयारी करायला पुरेसा वेळ मिळणार आहे. भारतीय संस्कृतीत सण वर्षभर असले, तरी 'दिवाळी हा सर्व सणांचा राजा' असं म्हटलं जातं. दिवाळीनिमित्ताने बाजारात होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा वर्षातल्या अन्य कुठल्याही काळापेक्षा कितीतरी अधिक असतो. ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी नवरात्रीपासूनच बाजार फुललेला असतो. मालाचा भरपूर पुरवठा असतो. जीएसटीतील सुधारणांमुळे जीवनावश्यक घरगुती उपयोगाच्या किंवा वाहनांसारख्या सणासुदीला खरेदी होणाऱ्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने त्याची मागणी यावेळी कितीतरी वाढेल, असा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुरवठा; म्हणजे उत्पादन वाढेल आणि त्या उत्पादनासाठी रोजगाराची मागणी वाढणं अपरिहार्य आहे. त्यामुळे, केवळ किमतीतील घटच नाही, रोजगाराच्या मागणीत वाढ झाल्यामुळेही अर्थचक्राला चांगली गती येईल. त्यामुळे, यावर्षी आनंदी आनंद कांकणभर जास्तच असेल, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे.

करप्रणालीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी देशाला जीएसटी सारखी करप्रणाली आवश्यकच होती. त्यामुळे जुलै २०१७ मध्ये जेव्हा ती लागू झाली, तेव्हा तिचं बहुशः स्वागतच झालं. त्यातल्या तपशिलाबाबत मात्र अनेक तक्रारी होत्या. करपात्र बाबींचं वर्गीकरण करताना केलेल्या पाच श्रेणी हे टीकेमागचं पहिलं कारण होतं. दुसरी तक्रार होती, ती वस्तूंच्या वर्गीकरणाबाबत. चपाती आणि पराठा यांना वेगवेगळ्या श्रेणीतून वेगवेगळे कर लावण्यात आले होते. तयार मालावरचा कर अनेक बाबतीत त्याला लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षा कमी होता! महिलांनी मासिक पाळीच्या काळात वापरायच्या पॅडचा प्रसार होणं, त्याचा वापर तळातल्या आर्थिक स्तरातही होणं महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक असल्याने त्यावर कमीत कमी कर असणं योग्यच होतं. पण, या पॅडसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर पॅडपेक्षा जास्त कर लावल्याने हेतू कसा साध्य होणार होता? हा प्रश्न होता. कपड्यांच्या बाबतीतही तसंच. सुती धाग्यावर १८ टक्के, कृत्रिम धाग्यावर १२ टक्के, तर तयार कपड्यांवर ५ टक्के कर होता. असं अनेक बाबतीत होतं. खाण्याचे पदार्थ, आयुर्वेदिक औषधं सुटी विकली, तर कर कमी; पण तीच पॅकबंद करून विकली, तर कर जास्त! अशा अनेक अर्थशून्य तरतुदी जुन्या पद्धतीत होत्या. संबंधित उत्पादक आणि विक्रेते त्या विरोधात सतत तक्रारी करत होते. पण, त्याची दखल घेतली गेली नाही. जीएसटीच्या धोरणात आणि आकार पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करताना त्याचा विचार झाला याबद्दल म्हणूनच आता समाधान व्यक्त होतं आहे. कर भरण्याची प्रक्रिया आणि परताव्याची मागणी यातही सुरुवातीला खूपच क्लिष्टता होती. परताव्याच्या मागण्या कितीतरी महिने तशाच पडून राहत होत्या. उलट, करभरणा करण्यास काही तासांचा विलंब झाला, तरी कर विभागाच्या नोटिसा येऊन धडकत होत्या. देशातला उत्पादक किंवा व्यापारी जमाखर्च किंवा ताळेबंदाचा तज्ज्ञ नाही. त्याची सगळी शक्ती व्यापाराचं व्यवस्थापन आणि वृद्धीसाठी लागलेली असते. त्यामुळे, कर भरण्याची तांत्रिकता, त्यासाठी आवश्यक संगणकीय ज्ञानाची गरज याने तो पुरता त्रस्त झाला होता. 'जीएसटी प्रणाली ही सरकार किंवा व्यापाऱ्यांपेक्षा सनदी लेखापालांच्याच हिताची आहे' अशी टीका त्यामुळेच झाली होती. पण, सर्व्हरबाबतच्या अडचणी, सतत बदलणारे नियम यामुळे खरं तर सनदी लेखापालही मेटाकुटीला आले होते. जीएसटी ०.२ ने याबाबतीत किती सुलभता आणली आहे, हे अद्याप स्पष्ट नाही. पण, सरकारच्यावतीने केल्या गेलेल्या निवेदनाचा सूर पाहता याबाबतच्या आवश्यक सुधारणाही केल्या असतील, अशी आशा आहे. कर आकारणी, कर भरणा आणि कर विभागाकडून होणारी तपासणी यात तफावत आली, तर दाद कुठे मागायची? हाही प्रश्न होता. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर. राज्या-राज्यांतील करांच्या दरफरकातील त्रास मोठ्या उत्पादकांना सहन करावा लागत होता. २०२५ च्या अखेरीपर्यंत राष्ट्रीय पातळीवर अशा अपिलीय न्यायाधीकरणाचं कार्यान्वयन करण्याचं आश्वासन त्यादृष्टीने खूपच महत्त्वाचं ठरणार आहे.

बहुतांश जीवनावश्यक बाबींच्या करश्रेणीत बदल होणार असल्याने कर घटणार आहेत. परिणामी सरकारच्या उत्पन्नातही घट होणार आहे. अर्थ विभागाच्या अंदाजानुसार सुरुवातीला ही घट सुमारे ४७ हजार कोटी रुपयांची असेल. भारताच्या अर्थव्यवस्थेचा एकूण आकार बघता ही घट अगदी किरकोळ आहे. दुसरं, कर कमी झाल्याने खरेदी-विक्रीत जी वाढ होईल आणि वाढत्या उलाढालीने जे अधिक कर उत्पन्न मिळेल, त्यात ही घट भरून निघेल, असाही अर्थ विभागाचाच विश्वास आहे. विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांनी आर्थिक वर्षाच्या अधेमधे केलेल्या या कर कपातीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. विद्यमान दराने कर उत्पन्न गृहीत धरून राज्यांनी आपले अर्थसंकल्प बेतले असल्याने त्यांचं सगळंच गणित बिघडेल, अशी तक्रार आहे. पण, वाढत्या व्यवहारांचा फायदा त्यांनाही मिळेलच. घट फार राहणार नाही. बाजाराला नवसंजीवनी देण्यासाठी सरकारने त्यांचं कर्तव्य केलं आहे. पुढची जबाबदारी आता उत्पादक आणि विक्रेत्यांची आहे. कर कपातीचा फायदा त्यांनी ग्राहकाला दिला पाहिजे. 'ग्राहकांचा संतोष हाच आमचा फायदा' हे ब्रीद तेव्हांच खरं होईल.

# फसव्या जाहिरातींना 'सीसीपीए'ची वेसण

जाहिरातीतून उत्पादनांची योग्य माहिती मिळून ग्राहकांना आवश्यक उत्पादनाची निवड करणे सुलभ व्हावे या उद्देशाने विविध माध्यमातून जाहिराती प्रसरित केल्या जाव्यात अशी अपेक्षा असते. पण तसे न होता आपल्या उत्पादनाचा खप वाढवण्यासाठी जाहिराती नानाविध पद्धतीने अतिरंजित करून प्रसारित केल्या जातात. जाहिरातीतील फसव्या दाव्यांना भुलून खरेदी करण्याच्या ग्राहकांच्या मानसिकतेमुळे उत्पादकांचे फावते. अशा भुरळ घालणाऱ्या जाहिराती पाहताना ग्राहकांनी सावध राहिले पाहिजे.




व्यवसायवृद्धी झाली तर उत्पादक कंपनीची आर्थिक स्थिरता वाढते. यासाठी कंपनीचे नाणे खणखणीत असले पाहिजे. त्याऐवजी फसव्या जाहिरातींद्वारे ती मागणी वाढवली जाऊन व्यवसायवृद्धी केली जाते तेव्हा ग्राहकांनी सजग होणे महत्त्वाचे ठरते. प्रथितयश व्यक्तींचा वापर करून, रचनात्मक, कलात्मक चित्रीकरण करून प्रसारित केलेल्या जाहिरातीमुळे उत्पादन वा सेवा खरेदी करण्यासाठी ग्राहकाला कित्येकदा आपली विचारसरणी बदलायला प्रवृत्त केले जाते आणि ग्राहकांच्या सवयी बदलण्याची किमया केली जाते. त्यामुळे केवळ जाहिरातीतील दाव्यावर अंध विश्वास न ठेवता चिकित्सक वृत्तीने त्याची सत्यासत्यता पडताळून आपल्या गरजेनुसार वस्तू किंवा सेवा घेण्याचा निर्णय घेतला, तर ग्राहकांवर पश्चात्तापाची वेळ खचितच येणार नाही. विशिष्ट शब्द, आकर्षक पंचलाईन, आवडता क्रिकेटपटू किंवा अभिनेता यांचा वापर करून प्रसारित केलेल्या खाद्यपदार्थ, निरनिराळी पेये यांच्या रंगीबेरंगी जाहिरातींचा भुलभूलैया लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सगळ्यांना असे पदार्थ सेवन करण्यास उद्युक्त करतो. शिवाय मोबाइलची बटणं दाबली की काही मिनिटांत सगळं काही घरपोच मिळतं. या पदार्थांच्या सेवनाने आपल्या तब्येतीत किंवा सौंदर्यात फरक पडू नये म्हणून मग योगसाधना करणे, मॅरेथॉन धावणे, जिममध्ये जाणे अशा विविध मार्गांचा पर्याय निवडला जातो. लिपोलेसर, कूलस्कल्प्टिंग तंत्रज्ञानाचा पर्यायही लठ्ठपणा कमी करण्यासाठी निवडला जातो. असे पर्याय बरेचदा जाहिराती बघूनच निवडले जातात.

कूलस्कल्प्टिंग तंत्रज्ञानात शरीरात जेथे मेद असतो त्या भागावर मशीन लावली जाते. ही मशीन तेथील मेद थंड करून त्यावर नियंत्रण ठेवते. यामुळेच कूलस्कल्प्टिंग मशीन केवळ त्वचाविकार आणि प्लास्टिक सर्जरीमध्येच नव्हे तर वैद्यकीय स्पा सेंटरमध्येही ठेवल्या जाऊ लागल्या आहेत. शस्त्रक्रियेविना वापरले जाणारे तंत्रज्ञान म्हणून गेल्या दशकापासून हे अधिक लोकप्रिय झाले असावे.

असाच एक पर्याय व्हीएलसीसीने आपल्या ग्राहकांसाठी दिला. लिपोलेसर, कूलस्कल्प्टिंगच्या एका सत्रात ग्राहकाची ६ सेंमी आणि ४०० ग्रॅम चरबी घटू शकेल असा दावा व्हीएलसीसीने जाहिरातीतून केला होता. पण यात तथ्य नसल्याचे लक्षात येताच हैदराबाद येथील अजय गुप्ता यांनी व्हीएलसीसीच्या जाहिरातीला आव्हान दिले. त्यांनी व्हीएलसीसी विरोधात केंद्रीय ग्राहक संरक्षण आयोगाकडे (सीसीपीए) कडे तक्रार केल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली.

आयोगाने तक्रारीत तथ्य असल्याचे जाणून सप्टेंबर २०२३ मध्ये एक कारणे दाखवा नोटीस पाठवली. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर बंदी असल्याने व्हीएलसीसीने कायद्याचे उल्लंघन केले आहे असा निष्कर्ष, महासंचालकांच्या चौकशीअंती काढण्यात आला. यावर व्हीएलसीसीने कूलस्कल्प्टिंगची वादग्रस्त जाहिरात बंद करण्यास सहमती दर्शवली; परंतु त्यातून ग्राहकांची दिशाभूल होत असल्याचे अमान्य केले. व्हीएलसीसी वापरत असलेल्या लिपोलेसर मशीनसाठी नियामक मंजुरी नसल्याने सुरक्षा मानकांची पूर्तता करण्यात व्हीएलसीसी अपयशी ठरले, जे ग्राहकांसाठी धोकादायक आहे, असे नियामक प्राधिकरणाने नमूद केले. तसेच व्हीएलसीसीने आपला दावा सिद्ध करण्यासाठी केलेल्या शास्त्रीय कसोटीसाठी भारतीय वा आशियाई लोकांचा समावेश न करता त्यासाठी ५७ परदेशी लोकांची निवड केली होती. याचा उल्लेख जाहिरातीत नव्हता. शिवाय व्हीएलसीसी कूलस्कल्प्टिंगसाठी येणाऱ्या ग्राहकांकडून, जाहिरातीतील कलमांचा उल्लेख असलेल्या नोंदणी अर्जावर सहमतीपर स्वाक्षरी घेत असल्याने हे दावे निराधार आणि ग्राहकांची दिशाभूल करणारे आहेत. त्यामुळे व्हीएलसीसी जाहिरातीतील दाव्यांची जबाबदारी झटकू शकत नाही. यामुळे ग्राहकाला सेवेची योग्य माहिती मिळण्याचा ग्राहकाचा अधिकार डावलला गेला असल्याचा आदेश केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण (सीसीपीए)चे मुख्य आयुक्त निधी खरे आणि आयुक्त अनुपम मिश्रा यांनी दिला. व्हीएलसीसीची बाजारपेठेतील पत आणि मागील दोन वर्षांची आर्थिक उलाढाल विचारात घेऊन अशी जाहिरात प्रकाशित केल्याबद्दल व्हीएलसीसी लिमिटेडवर ३ लाखांचा दंड ठोठावण्यात आला.

ा संरक्षण करण्यासाठी, अनुचित व्यापार पद्धती आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवून ग्राहकांच्या हिताचे नियमन करण्यासाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण(सीसीपीए), हे ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत स्थापन केलेले एक नियामक प्राधिकरण आहे. ग्राहक एक वर्ग म्हणून विभागीय आयुक्त अथवा जिल्हाधिकाऱ्यांकडे या संदर्भात तक्रार करू शकतो. तसेच राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनच्या टोल फ्री क्रमांक १८००-११-४००० किंवा १९१५ किंवा ८८०००१९१५ या एसएमएस क्रमांकावर ग्राहक यासंदर्भात वैयक्तिक तक्रार करू शकतो.

# दादांचा दरारा की दादागिरी!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा व्हायरल व्हिडीओ सध्या खूपच चर्चेत आहे. सोलापूरच्या कुर्डू गावातील मुरूम उत्खनन करर्णायांवर कारवाई करत असलेल्या एका आयपीएस अधिकारी महिलेला अजित पवार फोनवरून दमदाटी करताना त्यात दिसतात. म्हणजेच या व्हिडीओत त्यांचा आवाज ऐकू येत आहे. यावरून मागच्या दोन दिवसांपासून टीका झेलत असलेल्या अजित पवारांना अखेर नाईलाजास्तव का होईना या प्रकरणावर खुलासा करावा लागला आहे. अंजली कृष्णा नावाच्या या महिला आयपीएस अधिकारी आहेत. कुर्डू गावातील मुरूम उत्खनन करर्णाया काही जणांवर त्या कारवाई करत होत्या. ते सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांच्यापैकी एक राष्ट्रवादीचा तालुकाध्यक्ष होता. चार ते पाच दिवसांपूवीर्चे हे प्रकरण असल्याचे म्हटले जाते. अंजली कृष्णा कारवाईच्या पवित्र्यात असताना राष्ट्रवादीचे हे कार्यकर्ते त्यांना शाब्दिक प्रतिकार करत होते. ही चकमक सुरू असतानाच तालुका अध्यक्षांनी थेट अजित पवारांनाच फोन लावत हा फोन अंजली कृष्णा यांच्या हाती सोपवला. यावेळी अजित पवारांनी संबंधितांना सोडून देण्याचे निर्देश तालुका अध्यक्षांच्या फोनवरून कृष्णा यांना दिले. यातूनच पुढची गडबड झाली.





कृष्णा या मूळच्या महाराष्ट्राबाहेरील असल्यामुळे त्यांना अजित पवारांचा आवाज ओळखू आला नसावा. मैं डीसीएम अजित पवार बोल रहा हूँ. ये कारवाई बंद करोङ्कमेरा आदेश हैं.. असे अजित पवार त्यांना हिंदीतून सांगत होते. शेवटी त्या कुणी सर्वसामान्य व्यक्ती नाहीत की कुणाच्याही बोलण्यावर सहज विश्वास ठेवतील. त्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यामुळेच त्यांनी खातरजमा करण्यासाठी माज्या वैयक्तिक फोनवर कॉल करा, असे अजित पवारांना सांगितले. ज्यात काहीही चुकीचे नव्हते. मात्र, त्यामुळे अजित पवारांचा पारा आणखीनच चढला. मैं तुम पे ॲक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी.. मेरा चेहरा तो पेहचानोगी ना.. असे म्हणत अजित पवारांनी शेवटी त्यांना व्हिडीओ कॉल केला. हाच तो व्हिडीओ जो बघता बघता व्हायरल झाला आणि खुद्द उपमुख्यमंत्र्यांनी कारवाईचा इशारा दिल्यामुळे चिंतेत असलेल्या आयपीएस अधिकारी महिलेला प्रशासकीय स्तरातून पाठिंबा मिळू लागला. अजित पवार हे आपल्या रांगड्या स्वभावासाठी ओळखले जातात. सकाळपासूनच त्यांच्या कामाचा सपाटा सुरू होतो ते रात्री उशिरापर्यंत. अजित पवार एका बाजूला प्रशासकीय अधिकारी आणि दुर्सया बाजूला कार्यकर्त्यांच्या गराड्यात काम उपसत असतात. अजित पवारांकडे काम घेऊन गेलेला पक्षाचा कुठलाही पदाधिकारी, कार्यकर्ता खाली हाताने किंवा निराश मानेने परतत नाही ही अजित पवारांची ख्याती आहे.मागच्या कित्येक वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेला अजितदादांच्या कामाचा उरक बघून त्यांचे विरोधकही त्यांचे तोंड भरून कौतुक करताना दिसतात. महाराष्ट्रातील प्रशासकीय व्यवस्थेची नस अजित पवारांना चांगलीच माहीत आहे. ही यंत्रणा कशी काम करते आणि तिच्याकडून कशा रितीने काम करून घेतले पाहिजे हेदेखील अजित पवार चांगलेच ओळखून आहेत. त्यामुळे कधीकधी कामात हयगय झाल्यास अधिकारी-कर्मचार्यांना जाहीररित्या दमदाटी करायलाही ते मागेपुढे पाहात नाहीत. भीतीयुक्त दरारा निर्माण करणारे अजितदादा जाहीर व्यासपीठावर बोलताना कधीकधी तारतम्य विसरतात हेही तितकेच खरे. धरणातील पाणी संपल्यावर काय करायचं, याविषयी त्यांनी केलेले अफलातून विधान तर जगजाहीर आहे. पुण्यातील येरवडा कारगृहाच्या जमिनीचा मुद्दाही असाच गाजला होता. ताज्या प्रकरणातला फरक एवढाच की अजित पवारांच्या फोनमुळे ते बेकायदेशीर मुरुम उत्खनन कारवाईत हस्तक्षेप करत असल्याचे चित्र तयार झाले. मागच्या काही वर्षांमध्ये राज्यातील गाव-खेडी शहरांचा झपाट्याने विकास होत आहे. परिणामी गावातील लहानशा बांधकामांपर्यंत मर्यादित असणार्या वाळूची मागणी अलीकडच्या काळात प्रचंड वाढली आहे. वाळू उत्खननातून अत्यंत कमी कालावधीत बेसुमार पैसा मिळत असल्याने गाव-खेड्यातील तरुण मोठ्या संख्येने या व्यवसायात उतरला आहे. त्यातही संबंधित परिसरात ज्या राजकीय पक्षाचा दबदबा आहे त्या पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या व्यवसायात जम बसवला आहे. तर, काही ठिकाणी वाळू माफिया तयार झाले आहेत. हे वाळू माफिया सर्व सरकारी नियम पायदळी तुडवून दिवस-रात्र वाळूचा उपसा करतात. वाळू तस्करांनी त्यांची स्वतःची बेकायदेशीर यंत्रणाही बनवली आहे. जेसीबी, पोकलेन, यांत्रिक बोटी अशा अजस्त्र यंत्रांनी या व्यवसायात प्रवेश केला आहे. माफिया, सरकारी यंत्रणा आणि राजकीय वरदहस्त अशा साखळीच्या माध्यमातून नदीपात्रातील वाळू उपसून शहरांकडे पाठवली जाते.

अवैधरित्या वाळूचा उपसा करर्णाया वाळू माफियांवर कारवाई करर्णाया महसूल विभागाच्या पथकांवर वाळू माफियांनी हल्ले केल्याची अनेक उदाहरणे आहे. वाळूचा अवैध उपसा रोखून वाळू माफियांना चाप लावण्यासाठी महसूल विभागाने मध्यंतरीच्या काळात कठोर पावले उचलली होती. गौण खनिजासंदभार्तील अधिकार आता जिल्हाधिकार्यांकडे देण्यात आले आहेत. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करर्णाया वाळू माफियांवर एमपीडीए अंतर्गत गुन्हे नोंदवण्याचे तसेच या तस्करीत सामील महसूल अधिकारी, कर्मचार्यांवर निगराणी ठेवण्यात यावी. त्यांच्यावरही कडक कारवाईचे आदेश राज्य सरकारने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिलेत. वाळू माफियांवर कारवाई करताना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्या तरी त्यांना सोडू नका, अशी भूमिका राज्य सरकारची असताना खुद्द उपमुख्यमंत्र्यांकडून तसा आदेश आल्याने यंत्रणांचे खच्चीकरण होणे स्वाभाविक आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या दबंग दुनियेतल्या दादांनी इथे थोडे तारतम्य बाळगायची गरज होती. अर्थात महिला अधिकार्यांबद्दल आदरभाव व्यक्त करून वाळू माफियांविरोधात कठोर कारवाईस कटिबद्ध आहे, असा खुलासा दादांनी केला हे बरेच झाले. फक्त ते कृतीतून उतरायला हवे.

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.



# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त


**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

**चार्ज करताना लक्ष ठेवा**

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.



**पाण्यापासून दूर ठेवा**

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

**वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित**

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# आला उन्हाळा, हे ध्यानात ठेवा!

▮**उन्हाळा** आल्यावर अनेकदा शरीराला नवीन तापमानाशी जुळवून घेण्यात वेळ लागतो. अशात काही लहान आणि सामान्य गोष्टी असतात ज्यांचा आम्हाला विसर पडत असतो तर त्यांना रिकॉल करायला कुठलीच हरकत नसावी.

▮आता गरज आहे घरातून बाहेर निघताना सनस्क्रीन लोशन लावण्याची आणि स्कीन झाकून निघण्याची. सोबत पाण्याची बॉटल किंवा ग्लुकोज असणे उत्तम. कॉटनचे हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे योग्य ठरेल.

▮आहार बदल सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून आता मसालेदार, स्पाईसी, तळकट खाणे टाळा. लिक्विड डाइट अधिक घ्या. घरातून बाहेर पडण्यापूर्वी लिंबू पाणी, ताक किंवा फ्रूट ज्यूसचे सेवन करणे विसरू नका.

▮उन्हाळ्यातील फळं कलिंगड, काकडी, खरबूज, द्राक्ष, संत्री, स्ट्रॅबेरी, नारळ पाणी, आंबा आपल्या आहारात सामील करा.

▮उन्हाळ्यात रॉक साल्ट, जिरं, बडीशेफ आणि वेलची सारखे मसाले वापरून दही, कैरीचं पना, पुदिना, थंडाई, सातू हे सेवन करणे शरीरासाठी अनुकूल ठरेल.



# केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**

मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

## सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

■ मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.

■ तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.

■ सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.



■ मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.

■ एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.

■ सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.

# दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



# ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला? बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल

फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय-फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती अँड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय-फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय-फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. अँड्रॉइड स्मार्टफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंग्जमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक अँड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन ॲप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

# बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

■ थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.

■ उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.



■ थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.

■ थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे ॲलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.

■ थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्भवतात.

# मुंबईत यंदा एकूण १,९७,११४ गणेशमूर्ती विसर्जित

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईतील समुद्रकिनारे (चौपाटी) तसेच नैसर्गिक स्थळं आणि २९० पेक्षा अधिक कृत्रिम तलावांच्या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलेले अचूक नियोजन; मुंबई पोलीस दलासह अन्य शासकीय, निमशासकीय यंत्रणांचे सहकार्य तसेच सर्व सार्वजनिक मंडळे, श्रीगणेश भक्त आणि नागरिक यांची साथ यामुळे अनंत चतुर्दशी निमित्त श्रीगणेश मूर्ती विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडला. याबद्दल, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

माननीय उच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश, महाराष्ट्र शासनाच्या सूचना, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची मार्गदर्शक तत्वे याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून सार्वजनिक श्रीगणेशोत्सव २०२५ संदर्भात योग्य नियोजन आखून सर्व तयारी करण्यात आली होती. या तयारीला सर्व सार्वजनिक मंडळाकडून, श्रीगणेश भक्तांकडून प्रतिसाद लाभावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्यात आली होती.

रविवार, ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, यंदा श्रीगणेशोत्सवात एकूण १ लाख ९७ हजार ११४ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. यामध्ये १ लाख ८१ हजार ३७५ घरगुती तर १० हजार १४८ सार्वजनिक श्रीगणेशमूर्ती तसेच गौरी आणि हरतालिका मिळून ५ हजार ५९१ मूर्ती समाविष्ट आहेत. महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांचे फलित म्हणजे मुंबईतील श्रीगणेशभक्तांनी पर्यावरणपूरकतेचा अंगीकार करत कृत्रिम तलावांत मूर्ती विसर्जनाला सर्वाधिक प्राधान्य दिले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (परिमंडळ २) तथा सार्वजनिक गणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगणेशोत्सवात नागरिकांना विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या.



श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळ्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, कामगार मिळून सुमारे १० हजार मनुष्यबळ अविरतपणे कार्यरत होते. ७० नैसर्गिक स्थळं व सुमारे २९० पेक्षा अधिक कृत्रिम तलाव, छोट्या मूर्ती विसर्जनासाठी ६६ जर्मन तराफे, चौपाट्यांवर वाहने अडकू नयेत म्हणून १२०० हून अधिक स्टील प्लेट, २ हजार १७८ जीवरक्षक, ५६ मोटरबोटी, ५९४ निर्माल्य कलश आणि ३०७ निर्माल्य वाहने, विभागीय समन्वयासाठी २४५ नियंत्रण कक्ष, सुरक्षा देखरेखीसाठी १२९ निरीक्षण मनोरे, विसर्जनस्थळी ४२ क्रेन, २८७ स्वागत कक्ष, २३६ प्रथमोपचार केंद्र व ११५ रुग्णवाहिका, रात्रीच्या विसर्जनासाठी ६ हजार १८८ प्रखर प्रकाशझोताचे दिवे (फ्लडलाईट्स) व १३८ शोधकायार्साठीचे दिवे (सर्चलाईट्स), १९७ तात्पुरती शौचालये, आपत्कालीन तयारीसाठी अग्निशमन दलाचे वाहन आदी सोयी-सुविधा अखंडपणे पुरवल्या होत्या.

यावर्षी महानगरपालिका प्रशासनाने पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या होत्या. या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून व्यापक जनजागृती करण्यात आली.

मुंबईतील श्रीगणेशोत्सवात यंदा एकूण १ लाख ९७ हजार ११४ श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन झाले. यामध्ये १ लाख ८१ हजार ३७५ घरगुती तर १० हजार १४८ सार्वजनिक श्रीगणेशमूर्ती तसेच गौरी आणि हरतालिका मिळून ५ हजार ५९१ मूर्ती समाविष्ट आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सवासाठी केलेल्या जनजागृतीला यंदा मुंबईकरांनी उदंड प्रतिसाद दिला. त्यामुळे कृत्रिम विसर्जनस्थळांवर मूर्ती विसर्जित करण्याचा ओघ यंदा वाढला.

दिवसनिहाय श्रीगणेशमूर्ती विसर्जन

दीड दिवस - ६० हजार ४३४

पाच दिवस - ४० हजार २३०

सात दिवस - ५९ हजार ७०४

अकरा दिवस - ३६ हजार ७४६

एकूण - १ लाख ९७ हजार ११४

अकराव्या दिवशी विसर्जन झालेल्या एकूण श्रीगणेशमूर्ती- (७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतची आकडेवारी)

सार्वजनिक - ५ हजार ९३७

घरगुती - ३० हजार ४९०

हरतालिका / गौरी - ३१९

एकूण - ३६ हजार ७४६

अकरा दिवसांत गौरी आणि हरतालिका मिळून ५ हजार ५९१ मूर्ती विसर्जित

श्रीगणेशोत्सवादरम्यान ५०८ मेट्रिक टन निर्माल्य संकलित-

मुंबईतील श्रीगणेशोत्सवा दरम्यान निर्माल्यांचे संकलन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विशेष प्रयत्न करण्यात आले. सार्वजनिक मंडळांकडून योग्यप्रकारे निर्माल्य संकलित केल्यानंतर त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. मुंबईतील विविध विसर्जनस्थळी एकूण ५९४ निर्माल्य कलश आणि ३०७ निर्माल्य वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. त्याद्वारे एकूण ५०८ मेट्रिक टन निर्माल्य संकलित करण्यात आले आहे.

# गणेश मंडळाच्या कार्यकर्त्याचा मृत्युला जबाबदार कोण

■ **ठाणे । प्रतिनिधी,**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती विसर्जनासाठी नेताना एका कार्यकत्यार्चा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही दुर्घटना पश्चिम भाईंदरमध्ये शनिवारी (6 सप्टेंबर) घडली. प्रतीक शाह (34) असे या कार्यकत्यार्चे नाव असून तो मोदी पटेल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या विसर्जनासाठी जात होता. गंभीर बाब म्हणजे त्याला वाचवण्याचा प्रयत्नात आणखी एक कार्यकर्ता चिकटला होता. मात्र, इतरांनी प्रसंगावधान राखले आणि दुसऱ्या कार्यकर्त्याला वाचवले. मात्र, प्रतीक जीवानिशी केला.



भाईंदर पश्चिमेकडील मोदी पटेल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे 50 वे वर्ष आहे. त्यामुळे मंडळाने मोदी पटेल मार्ग तसेच मुख्य रस्त्यावर जोरदार विजेची रोषणाई केली होती. तसेच त्यांनी झाडांवर विजेची रोषणाई आणि विजेच्या तारा टाकल्या होत्या. त्यानंतर फांद्यावरील तोरणे काढून त्याला तारा बांधून विजेच्या तोरणमाळा लावल्या होता.

गणपती विसर्जनासाठी नेत असताना मोदी पटेल रस्त्याच्या नाक्यावर झाडाला हात लागून प्रतीक शाह याला विजेचा जबरदस्त शॉक बसला आणि तो तिथेच चिकटला. प्रतीकला वाचवायला आणखी एक कार्यकर्ता सरसावला आणि तोही चिकटला. त्यानंतर इतरांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत बांबूने दुसऱ्या कार्यकत्यार्ला बाजूला केले. त्यामुळे तो वाचला.

**काय घडलं**

अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने प्रतीक शाह सपत्नीक गणपतीच्या दर्शनाला आले होते. गणपतीची आरती झाल्यानंतर त्यांनी विसर्जनासाठी मूर्ती बाहेर ट्रॉलीवर ठेवली. त्यानंतर त्यांना शॉक लागला. या मृत्यूची दखल भाईंदर पोलिसांनी घेतली आहे. प्रतीकला पाच वर्षांचा मुलगा आहे. या दुर्घटनेनंतर शाह कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

झाडांवर विजेची रोषणाई करता येत नसतानाही येथील झाडांवर तसे करण्यात आले होते. याविरोधात गणपती उत्सवापूर्वी तक्रारी करूनही ना महापालिकेने कारवाई केली ना वीजपुरवठा करणाऱ्या अदानी कंपनीने कारवाई केली.


पावसात विजेच्या तारांच्या शॉकने दुर्घटना होऊ शकते, असे महापालिका आणि अदानी वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळवले होते. मात्र, कुणीही तक्रारीकडे गांभीयार्ने घेतले नाही. यामुळे प्रतीक शाह याचा बळी गेल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे महापालिका अधिकारी आणि अदानी कंपनीच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.

# पाहुणे आले आणि दागिने चोरून पसार झाले

■ **नाशिक । प्रतिनिधी,**

घरात मुक्कामासाठी आलेल्या पाहुण्यांनी रात्रीच्या सुमारास घरातील १८ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना बोरगड परिसरात घडली.

याबाबत फियार्दी संध्या अभिमन निकम (वय ४५, रा. आश्रमशाळेसमोर, बोरगड) यांनी दिलेल्या फियार्दीत म्हटले आहे की, आरोपी सागर सावळीराम फुलारे व जयश्री शांताराम बोरसे हे निकम यांच्या घरी दि. १७ ऑगस्ट रोजी मुक्कामी आले होते. दि. १७ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेच्या दरम्यान निकम या झोपलेल्या असताना दोघा



आरोपींनी घरातील पंचपात्रीत ठेवलेली ९ हजार रुपये किमतीची एक ग्रॅम वजनाची सोन्याची चीप व ९ हजार रुपये किमतीचा १ ग्रॅम वजनाचा सोन्याचा मणी असा एकूण १८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार संजय गवारे करीत आहेत.

# बेकायदेशीर कत्तलीसाठी नेलेला जनावरांचा कंटेनर परभणीत जप्त, चालक ताब्यात



■ **परभणी। प्रतिनिधी,**

पथरी-माजलगाव रस्त्यावरील पोखर्णी फाटा परिसरात बेकायदेशीर कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारा एक कंटेनर सतर्क नागरिकांनी अडवून पोलिसांच्या ताब्यात दिला. या कारवाईत २६ जनावरांची सुटका करण्यात आली आणि ४४ लाख १० हजार रुपयांचे मौल्यवान सामान जप्त करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, रेणापूर येथील काही नागरिकांना कंटेनर दिसल्यावर संशय आला आणि त्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला. पोखर्णी फाट्यावर कंटेनर थांबवून तपासणी केली असता, त्यात २६ जनावरे पूर्णपणे बंद अवस्थेत कोंबून ठेवलेली आढळली, जी वाहनाच्या क्षमतेपेक्षा खूप जास्त होती. नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली, त्यानंतर कंटेनरला पथरी पोलीस ठाण्यात आणले गेले. सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मराळ यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, पथरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, मोटार वाहन कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात, कंटेनर चालक शेख सागिर शेख शब्बीर (वय ४२) याला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. गाईंच्या कत्तलीवर बंदी असताना आणि गणेशोत्सवाच्या सणासुदीच्या काळात ही घटना घडल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# IPS अंजना कृष्णा अन अजित पवारांच्या वादात जयकुमार गोरेंचं मोठं वक्तव्य; म्हणाले, कुर्डूमधील कारवाई योग्यच, शासनातील कोणीही त्यांच्या पाठीशी राहणार नाही!

■ **सोलापूर। प्रतिनिधी,**

कुर्डू येथील मुरूम उपसा प्रकरणाच्या कारवाईमध्ये महिला आयपीएस अंजना कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील फोनमुळे राज्यभर मोठा वादंग निर्माण झाला होता. आज यावर माढ्याचे शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी पालकमंत्र्यांना याबाबत सवाल केला होता. आता सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या प्रकरणात मोठं वक्तव्य केलंय.

अवैध वाळू अथवा मुरूम माफीयांना सोडले जाणार नाही, हा माझा शब्द आजही कायम असून त्याचमुळे कुर्डू येथे मुरूम माफियांवर कारवाई झाली आणि गुन्हे दाखल झाल्याचे सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले आहे. अशा अवैध माफियांच्या सोबत सरकारमधले कोणीही पाठीशी उभे राहणार नाहीत, असे ठामपणे सांगत यापुढेही अशा कारवाया केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आज वाळू व मुरूम माफी यांच्याबाबत कठोर भूमिका घेताना अप्रत्यक्षपणे सरकार आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या पाठीशी असल्याचे संकेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहेत.




**मुरूम माफियांवरील कारवाई सुरूच राहणार**

मी आल्यापासून वाळू आणि मुरूम माफीयांचे धाबे कसे दणाणले हे सर्वांना माहीत असून विरोधक देखील मला याबाबत फोन करून कारवाई थोडी कमी करण्याची विनंती करतात. पुढच्या वेळी चुकी होणार नाही, यावेळी थोडी शिथिलता द्यावी, अशी विनंती विरोधक करत असतात. आम्ही मात्र जिल्हा प्रशासनाला कठोर कारवाईचे आदेश दिल्याने वाळू व मुरूम माफियांवरील कारवाई सुरू राहणार असल्याचे देखील पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे.

**काय म्हणाले होते धैर्यशील मोहिते पाटील?**

दरम्यान, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी कुर्डू या गावची परिस्थिती तर बीड पेक्षा भयानक असल्याचा आरोप केला होता. या गावात मुरूम माफीयांची मोठ्या प्रमाणात दहशत असून सरकारी जागेतील व मुंबई पुण्याला जगायला गेलेल्या गोरगरीब आणि दलित शेतकऱ्यांच्या शेतातील कोट्यावधी रुपयांचा मुरूम या माफीयांनी उचलला. शासनाने वरिष्ठ पातळीवरून या संपूर्ण गावाची तपासणी केल्यावर हे भयानक वास्तव समोर येणार असून गावातली ग्रामस्थ किती दहशतीत आहेत हेही दिसेल. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाळू आणि मुरूम माफीयांना सोडणार नसल्याची घोषणा केली होती. आता त्यांनी कुर्डू प्रकरणातील माफियांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली.

# पाऊस की उघडीप!

## पुढील पाच दिवस राज्यात कसं असेल हवामान?




**12 सप्टेंबरपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता**

मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाडा वगळता उर्वरित संपूर्ण विदर्भ, खान्देश व नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अश्या 21 जिल्ह्यांत शुक्रवार दिनांक 12 सप्टेंबरपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता जाणवते. मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाड्यातील 15 जिल्ह्यात मात्र ह्या दिवसात केवळ तुरळक ठिकाणी मध्यमच पावसाची शक्यता जाणवते

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

राज्याच्या काही भागात पाऊस सुरु आहे तर काही भागात पावसानं उघडीप दिली आहे. अनेक ठिकाणी पाऊस झाल्यानं नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत, धरणांच्या पाणीसाठ्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान, पुढील पाच दिवस राज्यातील हवामान कसं असेल? याबाबतची माहिती हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पुढील पाच दिवस राज्यात उघडीप राहणार असल्याचे खुळे म्हणाले.

उघडीप

संपूर्ण मराठवाडा, खान्देश, नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर जिल्ह्यांत आजपासून पुढील पाच दिवस म्हणजे गुरुवार दिनांक 11 सप्टेंबर पर्यंत पावसाची काहीशी उघडीप मिळण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह कोकणात व विदर्भात मात्र ही उघडीप परवा मंगळवार दिनांक 9 सप्टेंबरपासून जाणवेल असे खुळे म्हणाले.

दरम्यान, गेल्या काही दिवसात राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस झाला आहे. अनेक ठिकाणी पूरस्थिती देखील निर्माण झाली होती. त्यामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होत. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला होता. तसेच अनेक घरांचे देखील नुकसान झालं होते. अनेकांची जनावरे देखील दगावली होती. काही भागात जीवितहानी देखील झाली होती. दरम्यान, गेल्या चार ते पाच दिवसापासून राज्यात पावसाचा जोर कमी झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

**पुढील काळात वातावरणात मोठे बदल होणार**

राज्यातील काही भागात ढगाळ हवामान आणि किरकोळ भागात रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे. खास करून उत्तर महाराष्ट्र विभागात काही भागात पाऊस होईल इतर ठिकाणी किरकोळ हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. उद्यापासून राज्यातील बहुतांश भागात सूर्य प्रकाश मिळेल हवेची दिशा राज्यात काही भागात उत्तरे कडून होईल. पुढील काळात वातावरणात मोठे बदल सतत होत राहतील.

# ठामपा लोकशाही दिनाचे आयोजन

■ **ठाणे । प्रतिनिधी,**

ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवारी ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी ऑक्टोबर महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २२ सप्टेंबरपर्यंत त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र १ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर २०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com